स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई, जिल्हा बीड.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

SWAMI RAMANANDTEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE& HOSPITAL AMBAJOGAI , DIST BEED.
PH NO 02446/248438,247060 FAX – 02446/247132

No.SRTRGMCH/P.Store/ 6781 /2022 Date - 07/12/2022

## लेखन सामुग्री साहित्य खरेदीकरिता दरपत्रक सुचना

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील बाहयरुग्ण विभाग/सर्व कक्ष/विभाग/प्रशासकीय कार्यालयाकरिता वेळोवेळी खरेदी कराव्रे लागणारे लेखन सामुग्री साहित्य खरेदीकरिता त्यांचे दर सहा महीन्याच्या कालावधीकरिता निश्चित करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर कालावधी दरनिश्चीत पत्र निघाल्याच्या दिवसापासुन सहा महीन्याकरिता राहील.

सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख १५ /१२/२०२२ दुपारी ५.०० वाजे पर्यंतची असुन दिनांक १६ /१२/२०२२ रोजी सकाळी/ दुपारी वाजता मा.वैद्यकिय अधिक्षक, यांचे दालनात दरपत्रके उघडण्यात येतील. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहाता येईल. दरपत्रक मा.अधिष्ठाता स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई यांचे नावे रुग्णालय आवक विभागात सादर करावयाचे असुन ,दरपत्रकाच्या लिफाफयावर लेखन सामुग्री साहित्य खरेदीकरिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे .तसेच दरपत्रकावर पुरवठादाराने स्वत:चे दुकानाचे नाव नमुद करणे आवश्यक राहील. तसेच दर हे पुरवठादाराने त्याचे लेटरहेडवर खालील नमुण्यात त्याच क्रमाने देण्यात यावे जिथे दर द्यायचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येऊ नये. तसेच **दरपत्रकासोबत पुरवठादाराने दुकाननोंदणी प्रमाणपत्र ,पॅनकार्ड, आधार कार्ड व जीएसटी क्रमांक प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सादर करणे आवश्यक राहील तसेच या दरपत्रक सुचनासोबत निवीदाकारांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना सादर करणे आवश्यक आहे.**

**सर्व दर हे दरपरिमाना करिता सर्व कर सामाविष्ट करुन नमुद करावे**. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे **तसेच दरपत्रकाचा सहा महीन्याचा कालावधी संपुष्टात येईपर्यंत साहित्याचा पुरवठा करणे दरपत्रकदारास बंधनकारक राहील.त्याबाबतचे लेखी हमीपत्र दिल्यानंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येतील.** तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यात येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दरनिश्चीत झाल्यावर आवश्यकतेनुसार बाब निहाय न्युनतम दर देणा-या पुरवठादाराचे नाव /दर निश्चीत करण्यात येईल. त्यानुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येतील. **आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसामध्ये वस्तुचा पुरवठा करावा लागेल अन्यथा आदेश रद्द करण्यात येतील**.आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसामध्ये वस्तुचा पुरवठा करावा लागेल. व त्याचे मुळ देयक तिन प्रतीत मा.अधिष्ठाता स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई. यांचे नावाने सादर करावे लागेल.खालील दर्शविलेल्या साहित्याचा दर्जा उत्तम असावा अन्यथा साहित्य निकृष्ट दर्जाचे पुरवठा केले तर स्विकारले जाणार नाही याबाबतची नोंद पुरवठादारांनी घ्यावी.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | प्रतिनग /बंडल/पॉकेट | दर |
|---|---|---|---|
| १ | रजिस्टर २ क्वायर | प्रति नग | |
| २ | रजिस्टर ४ क्वायर | प्रति नग | |
| ३ | रजिस्टर ६ क्वायर | प्रति नग | |
| ४ | रजिस्टर ८ क्वायर | प्रति नग | |
| ५ | पांढरे कागद १/४ साईज | प्रति रिम | |
| ६ | झेरॉक्स पेपर १/४ साईज | प्रति रिम | |
| ७ | टाचणी (छोटी साईज) | प्रति पॉकिट | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | टाचणी (मोठी साईज) | प्रति पॉकिट | |
| ९ | बॉक्स फाईल | प्रति नग | |
| १० | स्टँप पॅड छोटे (कॅमल) | प्रति नग | |
| ११ | इंक बॉटल १५० मि.ली. | प्रति नग | |
| १२ | स्टॅपलर नं. १० कांगारु | प्रति नग | |
| १३ | स्टॅपलर नं. २४ कांगारु | प्रति नग | |
| १४ | स्टॅपलर पीन नं. १० | प्रति पॉकिट | |
| १५ | स्टॅपलर पीन नं. २४ | प्रति पॉकिट | |
| १६ | कॅल्क्युलेटर १२ डिजीट कॅसीओ | प्रति नग | |
| १७ | निळे कार्बन | प्रति बॉक्स | |
| १८ | पंचींग मशीन (छोटी) | प्रति नग | |
| १९ | पंचींग मशीन (मोठी) | प्रति नग | |
| २० | टोच्या | प्रति नग | |
| २१ | मार्कर पेन | प्रति नग | |
| २२ | व्हाईटनर | प्रति नग | |
| २३ | व्हाईट बोर्ड मार्कर पेन | प्रति नग | |
| २४ | मेणबत्ती मोठी साईज | प्रति नग | |
| २५ | टेबल काच (४X६) | प्रति नग | |
| २६ | प्लॅस्टीक फुटपट्टी | प्रति नग | |
| २७ | स्टॅपलर नं. 45 | प्रति नग | |
| २८ | लाख कांडी | प्रति बॉक्स | |
| २९ | फाईल टॅग पांढरे | प्रति बंडल | |
| ३० | शाई बॉटल १०० मि.ली. (लाल कलर) | प्रति बॉटल | |
| ३१ | टपाल पॉकेट (६ इंच X12 इंच) | प्रति नग | |
| ३२ | स्टॅप पॅड शाई बॉटल ( २५ एम.एल.) | प्रति बौटल | |
| ३३ | खडू पांढरे | प्रति बॉक्स | |
| ३४ | खडू कलर | प्रति बॉक्स | |
| ३५ | ऑफीस फाईल | प्रति नग | |

अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई

प्रत :- प्रशासकीय कार्यालय नोटीस बोर्ड /वेबसाईड स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.व रु.अंबाजोगाई.

## प्रपत्र -अ

### निवीदाकरांनी दयावयाचा हमीपत्राचा नमुना

मी/ आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिका-या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्षनाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रिये मध्ये भाग घेणा-या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.